ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख २१ जून, १९६१ | अंक ११

## विविध माहिती

**खाजगी उद्योगधंद्यांचें स्थान**—कोपनहेगन येथें कॉंग्रेस ऑफ इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सचें अधिवेशन भरलें होतें. अधिवेशनांत भाषण करतांना हिंदी प्रतिनिधि मंडळाचे अध्यक्ष श्री. मदनमोहन रुइया म्हणाले कीं, अविकसित देशांचें औद्योगीकरण घडवून आणण्याच्या कामांत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना भरपूर वाव आहे. म्हणूनच भारतानें मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला आहे.

**जागतिक बँकेचें कर्ज**—भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत खाजगी मालकीच्या कोळशाच्या खाणींचा विकास करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठी जागतिक बँकेनें ३० कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. कर्जाच्या शर्ती निश्चित करण्यासाठी कोळशाच्या धंद्याचे प्रतिनिधि लवकरच अमेरिकेला जाणार आहेत.

**सेवानिवृत्तीचें वय**—उत्तर प्रदेश सरकारनें आपल्या नोकरांचें सेवानिवृत्तीचें वय ५८ ऐवजीं ५५ केलें आहे. ज्या नोकरांना पूर्वीच्या वयाप्रमाणें सेवानिवृत्त होण्यास अद्याप अवकाश आहे, पण ज्यांना नव्या नियमाप्रमाणें आतां लवकर निवृत्त व्हावें लागेल त्यांना ७ महिन्यांचा अवधि देण्यांत आला आहे. १९६१ अखेर त्यांना निवृत्त व्हावेंच लागेल.

**भद्रावती येथील पोलादाचा कारखाना**—भद्रावती येथील पोलादाचा कारखाना चालविण्यासाठी म्हैसूर सरकारनें एका कॉर्पोरेशनची स्थापना करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनच्या भाग-भांडवलापैकीं ४० टक्के भांडवल मध्यवर्ती सरकारकडून उभारलें जाणार आहे. बाकीचें भांडवल राज्य सरकार देईल. भद्रावतीचा कारखाना कॉर्पोरेशननें व्यापारी पद्धतीनें चालवावा असे भारत सरकारचें मत आहे.

**भारतीय नृत्यनाट्याचें कौतुक**— भारताच्या भारतीय कला-केंद्राच्या पथकानें रशिआंतील स्टालिनाबाद ह्या ठिकाणीं आपला पहिला कार्यक्रम सादर केला. ' कुमारसंभव ' ह्या कालिदासाच्या कृतीवर आधारलेलें हें नृत्यनाट्य येथील लोकांना फार आवडलें. नृत्यनाट्याचें चित्रवाणीवर प्रक्षेपणहि करण्यांत आलें. प्रयोगाच्या आधीं कित्येक दिवस सर्व तिकिटें खपलेलीं होतीं.

**वीजपुरवठा बंद पडल्यानें नुकसान**—गेल्या महिन्यांत पुण्यांतील गणेशखिंड विद्युत्-गृहांत स्फोट होऊन कांहीं दिवस विजेचा पुरवठा बंद पडला. त्यामुळें कित्येक कारखान्यांना काम बंद ठेवावें लागलें. परिणामीं उद्योगधंद्यांचे १ कोटी रुपयांचें नुकसान झालें असा अंदाज करण्यांत आला आहे. खुद्द वीज कंपनीचें ७० हजार रुपयांचें नुकसान झालें.

**खोट्या आंकड्यांविरुद्ध मोहीम**—रशिअन सरकारनें सरकारतर्फे जमा करण्यांत येणाऱ्या आर्थिक माहितीसंबंधींच्या आंकड्यांत खोटेपणा करण्याविरुद्ध एक हुकूम काढला आहे. राष्ट्रीय उत्पादनासंबंधीं आंकडे कसे गोळा करावे ह्याविषयीं त्यांत तपशीलवार सूचना देण्यांत आल्या असून, संबंधित सरकारी अधिकाऱ्यांवरील जबाबदारी निश्चित करण्यांत आली आहे. हुकुमाची अंमलबजावणी अतिशय कडक रीतीनें करण्यांत येणार आहे.

**नैसर्गिक वायूचें संशोधन**—राजस्थानमधील जयसलमीर भागांत नैसर्गिक वायु सांपडण्याचा संभव आहे. हें काम भारत सरकारचें खनिज खातें करणार होतें. पण कामाचा अनुभव नसल्यामुळें आतां तें एखाद्या परदेशीय कंपनीकडे सोपविण्यांत येणार आहे. फ्रेंच सरकारची पेट्रोलविषयक संस्था ह्या कामीं आस्था दाखवित आहे. फ्रेंच सरकारचे तज्ज्ञ लवकरच हिंदमध्यें वाटाघाटीसाठी येतील.

**चंद्रावर जाण्याचा प्रयत्न**—अग्निबाण शास्त्रांत रशिआ व अमेरिका ह्यांची जोराची स्पर्धा चालू आहे. दोघेहि चंद्रावर पहिला माणूस पाठविण्याची तयारी करीत आहेत. अमेरिका १९६७ ते १९७० ह्या कालांत केव्हां तरी, माणूस असलेला अग्निबाण चंद्रावर पाठवील व तेथून त्याला यशस्वी रीत्या परत आणील, असा अंदाज आहे. ह्या बाबतींत रशिआची तयारी मात्र गुप्त आहे.

**पाकिस्तानांतील तेलाचा शोध**—पाकिस्तानमधील भूमिगत तेलाचा शोध लावण्यासाठी पाकिस्तान व रशिआ ह्यांच्यांत करार झाला आहे. त्यास अनुसरून रशिअन तंत्रज्ञांचें एक मंडळ कराचीला आलें आहे. करारांतील शर्तीप्रमाणें रशिआ पाकिस्तानला २ कोटी डॉलर्स कर्ज देणार आहे. त्याची फेड पाकिस्ताननें १२ वर्षांत करावयाची आहे. त्याचा उपयोग करून पाकिस्ताननें रशिआकडून जरूर ती यंत्रसामग्री घ्यावयाची आहे.

**साखर कारखान्यांना जळणाचा तुटवडा**—श्रीरामपूर भागांतील ११ साखर कारखान्यांना जळणाचा तुटवडा भासूं लागला आहे. ह्या कारखान्यांना दरसाल ७ लाख मण जळाऊ लाकूड लागतें. गेल्या दोन वर्षांपासून लाकडाच्या टंचाईमुळें त्याचे भाव वाढत चालले आहेत. नगर जिल्ह्यांतील जंगल मोठ्या प्रमाणावर तोडलें गेल्यानें ही टंचाई वाढतच जाणार आहे. म्हणून भंडारदरा विद्युत्-योजना हातीं घेण्यांत यावी अशी सूचना करण्यांत येत आहे.

## मच्छीमारीच्या व्यवसायासाठी कंपनी

भारताच्या किनाऱ्यानजिक चालणाऱ्या मच्छीमारीच्या व्यवसायासाठी एका कंपनीची स्थापना लवकरच करण्यांत येणार आहे. हिंदी भांडवलदार आणि अमेरिकन भांडवलदार ह्यांच्या संयुक्त कंपनीला ह्या संबंधींचा परवाना देण्यांत आला आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल ३ कोटी रुपयांचें असेल. परंतु त्यापैकी ७५ लाखांचें भांडवलच प्रथम विक्रीस काढण्यांत येणार आहे. कंपनीचें कार्यक्षेत्र विशाखापट्टमचा किनारा राहील. ह्या भागांत पकडलेले मासे अमेरिकेला निर्यात करण्यांत येतील. भांडवलामधील परदेशीय चलनाचा हिस्सा अमेरिकन कंपनी पुरविणार आहे. अशाच प्रकारची एक कंपनी कांहीं वर्षांपूर्वी मुंबईला स्थापन करण्यांत आली आहे. ह्या कंपनीला जपानचें सहकार्य लाभलेलें आहे.

## कम्युनिस्ट अणुशास्त्रज्ञांची परिषद


पोलंडमधील क्रॅको ह्या शहरीं सात कम्युनिस्ट देशांतील अणुशास्त्रज्ञांची परिषद् भरली आहे. परिषदेला ४० शास्त्रज्ञ हजर राहिले आहेत. सोव्हिएट् रशिआंतील डुबनो ह्या गांवीं रशिआची अणुविज्ञानशाळा आहे. आतांपर्यंत कम्युनिस्ट देशांतील अणु–शास्त्रज्ञांच्या परिषदा येथेंच भरत असत. रशिआच्या सरहद्दीबाहर भरणारी ही पहिलीच परिषद् आहे. 'सायक्लोट्रॉन' ह्या प्रचंड अणुयंत्राविषयीं परिषदेंत चर्चा होणार आहे.

## ब्रिटनच्या लोकसंख्येंत वाढ

गेल्या १० वर्षांत ब्रिटनच्या लोकसंख्येंत २५ लाखांची भर पडली आहे. १९६१ सालीं ब्रिटनची लोकसंख्या ५,२६,७५,०९४ असल्याचें आढळून आलें ब्रिटनमधील पहिली शिरगणती १६० वर्षांपूर्वी झाली. ह्या कालांत एकंदरीनें मुलींपेक्षा मुलगेच अधिक जन्माला आले. तरीसुद्धां पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या ब्रिटनमध्यें नेहमींच अधिक राहिली. १९२१ मध्यें १,००० पुरुषांमागें १,०९६ स्त्रिया असें प्रमाण होतें. पहिल्या महायुद्धांत पुरुषांची हानि अधिक झाल्यामुळें प्रमाणांतील विषमता अधिक वाढली. १९६१ मध्यें १,००० पुरुषांमागें १,०६६ स्त्रिया असें प्रमाण आढळून आलें आहे.


## गुजरात राज्यांतील पाकिस्तानी नागरिक

गुजरात राज्यांत पाकिस्तानांतून विगर परवाना आलेले ६,००० नागरिक राहत आहेत. हे पाकिस्तानी नागरिक मालाची चोरटी आयात करतात आणि भारतविरोधी कारवाया करतात. कच्छच्या रणामधून अगर समुद्रमार्गें ते सौराष्ट्रांत येतात. त्यांच्या आगमनामुळें पोलीस खात्याला सुरक्षिततेचा प्रश्न भेडसावीत आहे. पुरेसे अधिकार नसल्यामुळें पोलीसखातें परिस्थितीला आळा घालूं शकत नाहीं असें म्हणतात.

... सेवेसी तत्पर हजर

शहरांतील ड्रेनेज खातीं, पुलाचा पाया, पूरग्रस्त जमीन अगर जमीनीचें उत्खनन यांवर कामें करणारे कॅंट्राक्टर (ठेकेदार) यांना पूर्वी जमीनींतील घाणेरडे पाणी काढून टाकणें हे अत्यंत जिकीरीचे काम होते. परंतु आतां किर्लोस्कर सेल्फ प्रायमिंग पंप त्यांच्या सेवेस सदैव तत्पर हजर आहे. जमीनींतील पाणी काढून टाकणे म्हणजे त्यांच्या हातचा मळ आहे.



किर्लोस्कर

सेल्फ प्रायमिंग पम्प

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली.

STUSA KM7/60

# अर्थ

बुधवार, ता. २१ जून, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आनुषंगिक व साहाय्यक उद्योगधंद्यांचें महत्त्व

मंगलोर येथील कॅनरा वर्कशॉप लि. ह्या कंपनीनें नागपूर येथें विदर्भ ऑटो स्प्रिंग्ज अँड अॅन्सिलिअरीज ह्या नांवाचा कारखाना काढला आहे. मोटारींना लागणारे अनेक प्रकारचे सुटे भाग ह्या कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहेत. अलीकडे नागपूरचें राजकीय महत्त्व पूर्वीच्या मानानें कमी झालें आहे. परंतु विदर्भांतील उद्योगधंदे वाढत चाललेले आहेत. भंडारा येथें दारूगोळ्याचा कारखाना काढण्यांत आलेला आहे. कामटी येथील कोळशाच्या खाणी चालू करण्यांत आलेल्या आहेत. मोटारींना लागणाऱ्या सुट्या भागांच्या कारखान्याचें उद्घाटन मध्यवर्ती सरकारचे पोलाद, खाणी व जळणमंत्री सरदार स्वर्णसिंग ह्यांच्या हस्तें झालें. त्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले, की देशाचा मूलभूत औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठीं चार गोष्टींवर भर देण्यांत आला पाहिजे. त्या म्हणजे पोलाद, औद्योगिक शक्ति, यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञांचें शिक्षण. भारत सरकार ह्या दृष्टीनें जोराचे प्रयत्न करीत आहे. तथापि केवळ मोठ्या उद्योगधंद्यांच्या स्थापनेमुळें औद्योगिक विकास त्वरित साध्य होणार नाहीं. मोठ्या कारखान्यांना लागणाऱ्या अशा कितीतरी वस्तु असतात कीं ज्यांच्या निर्मितीवर वेळ घालविणें त्यांना परवडत नाहीं. अशा वस्तु निर्माण करणारे आनुषंगिक व साहाय्यक कारखाने काढण्यांत आले तर मोठ्या कारखान्यांचा वेळ व सामग्री ह्यांची बचत होईल. त्याशिवाय साहाय्यक कारखान्यांना कांहीं प्रमाणांत रोज खपाच्या वस्तूंचीहि निर्मिति करतां येईल. किरकोळ प्रकारच्या उत्पादनांत मोठ्या कारखान्यांचा वेळ व श्रम अनाठायी गेले नाहींत तर त्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता त्यांना वापरतां येणें शक्य होईल. अर्थात् त्याचा परिणाम मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासाची गति वाढण्यांत होईल. साहाय्यक धंद्यांचा हा उपयोग अप्रत्यक्ष असला तरी महत्त्वाचा आहे.

---

## दारूबंदीचा विस्तार वाढविण्यासाठी उपाययोजना

भारताच्या नियोजन समितीनें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाविषयीं आपला जो अहवाल सादर केला आहे, त्यांत दारूबंदीचा विस्तार देशभर करण्यासाठी उपाय सुचविण्यांत आले आहेत. अहवालांत असें म्हटलें आहे कीं, देशांत उद्योग व व्यापार ह्यांची वृद्धि नियोजनांच्या मार्गानें होत आहे. परंतु त्याचबरोबर दारू पिण्याची प्रवृत्तीहि वाढत चाललेली दिसून येत आहे. ही प्रवृत्ति शहरांत विशेष लक्षांत भरण्यासारखी वाढत आहे. शहरांतील सामाजिक थरांपैकीं कांहीं थर आर्थिक दृष्ट्या भरभराटले आहेत. त्यामुळें त्यांच्यांत स्वतःची श्रीमंती दाखविण्याची वृत्ति वाढली आहे. दारू पिऊन श्रीमंती दाखविण्याचा हा मार्ग अर्थातच अनिष्ट आहे. खोट्या मूल्यांमुळें सामाजिक सुधारणेला जी दिशा लागावयास पाहिजे ती न लागण्याचा संभव आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत दारूबंदी देशभर पसरविण्याच्या कामीं जितकी प्रगति व्हावयास पाहिजे होती तितकी तीं झालेली नाहीं. शिवाय प्रगतीचा वेगहि बेताचाच आहे. तथापि निरनिराळ्या राज्यांत संपूर्ण दारूबंदीच्या तारखाच ठरविण्यांत आल्या पाहिजेत असें नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतहि अशा तारखा ठरविण्यांत आलेल्या नाहींत. तसें करणें व्यवहार्यहि नाहीं. दारूबंदीचा कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी सर्व राज्यांनीं एकाच वेळी प्रयत्न केले पाहिजेत. ज्या राज्यांतील कांहीं भागांत दारूबंदी असेल त्या राज्यांनी तिची व्याप्ति वाढविण्याची कोशीस करावी. दारू विकणाऱ्या दुकानांच्या संख्येंत हळूहळू कपात करावी. दारू गाळणाऱ्या कारखान्यांत तयार होणारा मद्यार्क कमी अंमली असेल अशी दक्षता घ्यावी. दारूचीं दुकानें अधिक दिवस बंद ठेवावीं. लोकवस्तीच्या मुख्य भागापासून दारूचीं दुकानें दूर ठेवावीं आणि सार्वजनिक जागीं दारू पिण्यास बंदी करावी.

---

## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील बोट-वाहतूक

मध्यवर्ती सरकारचे वाहतूक व दळणवळण खात्याचे मंत्री श्री. राज बहादूर मुंबई येथें एका प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं, भारतामधील बोट-वाहतुकीचा विस्तार करण्यासाठी सध्यां जी आर्थिक तरतूद करण्यांत आली आहे तिचा उपयोग करून घेण्यांत आल्यावर नियोजन समितीकडून अधिक पैसा मिळण्याचा संभव आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत बोटींची संख्या वाढविण्यासाठी एकूण ६२·५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. भारत स्वतंत्र झाला त्या वेळी देशांत अवघ्या १ लाख टन वजनाच्या बोटी होत्या. चालू सालच्या मार्च महिनाअखेर भारताजवळ ८·५७ लाख टन वजनाच्या बोटी होत्या. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें उद्दिष्ट ९ लाख टन ठरविण्यांत आलें होतें. तथापि भारतांत व भारताबाहेर आणखी बोटी बांधण्याचें काम चालू आहे. हिंदी बोट-वाहतूक कंपन्यांच्या मालकीच्या बोटींत त्यांची भर पडणार आहे. ही भर लक्षांत घेतली तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें लक्ष्य गांठण्यांत आलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तें कसेंहि असलें तरी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतामधील बोट-वाहतूक कंपनीच्या बोटींचें वजन १० लाख टनाच्या पुढें जाईल ह्यांत शंका नाहीं. दर्यावर्दी देशांत व लोकांत ही अवस्था समाधानकारक मानली जाते. व्यापारी बोटींवर लागणाऱ्या कुशल माणसांना शिकवून तयार करण्यासाठी सध्यां सहा संस्था अस्तित्वांत आहेत. त्यांपैकीं फक्त एकच संस्था स्वातंत्र्यपूर्व काळांतील आहे. आतांपर्यंत अशा शिक्षण-केंद्रांवर २·७५ कोटी रुपये खर्च करण्यांत आले आहेत आणि सुमारें २०,००० हजार लोकांना त्यामधून शिक्षण देण्यांत आलें आहे. नॅशनल शिपिंग बोर्डानें केलेल्या शिफारसीच्या मानानें बोट-वाहतुकीच्या विस्ताराला तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कमी पैसे देण्यांत आले आहेत. पण परदेशीय चलनाची टंचाई हें त्याचें कारण होय.

## कंपन्यांच्या कारभारांत सुधारणा

### कडक कायद्याचे सुपरिणाम

कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशनच्या कारभाराचा चवथा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, तो बराच बोधप्रद आहे. १९५९–६० मध्यें वार्षिक तक्ते, स्पेशल ठराव, बोजे व त्यांची भरपाई, डायरेक्टर्स वगैरे बाबत तपशील, इत्यादींचे १,३१,४६२ कागदपत्रें नोंदण्यांत आलीं. १९५८–५९ मध्यें तत्सम आंकडा १,१३,३१९ होता. भागीदार, जुने नोकर, जुने डायरेक्टर्स, इत्यादींकडून रजिस्ट्रारकडे करण्यांत आलेल्या तक्रारींची संख्या १९५९–६० मध्यें ८०० होती; त्या पूर्वीच्या वर्षी ती १,२९२ होती. तक्रारी कमी झाल्या ह्याचा अर्थ कंपन्यांचा कारभार कांहींसा सुधारला, असा करण्यास हरकत नाहीं.

कंपन्यांची व्यवस्था पाहण्यासाठी मॅनेजिंग एजन्सीची पद्धत अहितकारक आहे, असें सरकारचें मत आहे. ह्या पद्धतीचें हळूहळू उच्चाटन करणें, हें कंपनी कायद्याचें एक उद्दिष्ट आहे. १९५५ मध्यें ५,००० कंपन्या मॅनेजिंग एजन्सीखालीं होत्या; १९६० अखेर ती संख्या १,३४५ वर उतरली. कंपन्यांवर भरण्यांत आलेल्या खटल्यांची संख्या सालोसाल वाढत आहे, ह्याचा अर्थ कंपनी कायद्याची अंमलबजावणी दक्षतेनें होत आहे. १९५६-५७ मध्ये १०, १९५७–५८ मध्यें १,१८७, आणि १९५८–५९ मध्यें ४,११५ खटले भरण्यांत आले. अहवालांत अपप्रकारांचें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे, त्यांत मंजुरी न घेतां मॅनेजिंग एजंटांना किमान वेतन देणें, डायरेक्टरांचा हितसंबंध असलेल्या बँकांत पैसे ठेवणें, हिशेबांत इनव्हेस्टमेंट स्टॉक–इन–ट्रेडमध्यें दाखविणें, जुनें नुकसान कायम ठेवून चालू नफ्यांतून डिव्हिडंड वाटणें, प्रॉस्पेक्टसला अकौंटंटचा रिपोर्ट न जोडणें, इत्यादींचा उल्लेख आहे. तथापि, एक–दोन वर्षांत कायद्याच्या तरतुदींचें पालन करण्याची कंपन्यांना सवय लागेल, अशी अपेक्षा आहे.

अहवालाचे वर्षी नव्या कंपन्यांच्या नोंदींत वाढ दिसून आली. कंपनी कायद्याच्या कडक तरतुदींमुळे नव्या कंपन्या काढण्यास आळा बसेल, ही भीति फोल ठरली आहे. १९५९–६० मध्यें १६०·५ कोटी अधिकृत भांडवलाच्या १,४५२ कंपन्या नोंदल्या गेल्या. १९५८–५९ मध्यें १,०९५ आणि १९५७–५८ मध्यें ९६१ कंपन्यांची नोंद झाली होती. १,४५२ नव्या कंपन्यांपैकी १,३६५ प्रायव्हेट लिमिटेड होत्या व त्यांचें अधिकृत भांडवल ९३·४ कोटी रु. होतें.

**नव्या कंपन्यांच्या नोंदी**

| | पब्लिक | | प्रायव्हेट | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | अधिकृत भांडवल × | संख्या | अधिकृत भांडवल × | संख्या | अधिकृत भांडवल × |
| १९५७–५८ | ६५ | ५२·७ | ८९६ | ५०·० | ९६१ | १०२·७ |
| १९५८–५९ | ५८ | ५८·७ | १,०७३ | २२५·७ | १,०९५ | २८४·४ |
| १९५९–६० | ८७ | ६७·१ | १,३६५ | ९३·४ | १,४:२ | १६०·५ |

× कोटी रु.

मद्रास, केरळ, आंध्र प्रदेश आणि म्हैसूर ह्या (दाक्षिण) विभागांत नव्या कंपन्यांची वाढ विशेषेंकरून होत आहे. पूर्व विभाग इतके दिवस अग्रेसर होता, त्याला दक्षिण विभाग आतां गाठूं पाहत आहे. प. बंगाल, मुंबई, मद्रास आणि दिल्ली येथेंच नव्या कंपन्यांच्या सर्वांत जास्त नोंदी होतात; इतर राज्यें अजून मागासलेलीं दिसतात.

**नव्या कंपन्यांची राज्यवार वांटणी**

| | १९५७–५८ | १९५८–५९ | १९५९–६० |
|---|---|---|---|
| मुंबई | १९१ | २४० | २९३ |
| दिल्ली | ११७ | १३० | १४१ |
| मद्रास | ८० | ११३ | ३४५ |
| प. बंगाल | ३५९ | ३६४ | ३९९ |
| इतर राज्यें | २१४ | २४८ | २७४ |
| एकूण | ९६१ | १,०९५ | १,४५२ |

**चालू कंपन्या**

| | पब्लिक | प्रायव्हेट | एकूण |
|---|---|---|---|
| १९५४–५५ | १०,०५६ | १९,५६९ | २९,६२५ |
| १९५५–५६ | ९,५७५ | २०,२९९ | २९,८७४ |
| १९५६–५७ | ८,८१० | २०,५४७ | २९,३५७ |
| १९५७–५८ | ८,२९६ | १९,९८४ | २८,२८० |
| १९५८–५९ | ७,७६० | १९,७१९ | २७,४७९ |
| १९५९–६० | ७,३०६ | १९,६१५ | २६,९२१ |

### कंपन्यांची संख्या घटली; वसूल भांडवल वाढलें

चालू कंपन्यांची संख्या उतरत गेली, तरी त्यांचें वसूल भांडवल वाढत गेलें आहे. १९५४–५५ मध्यें १०,०५६ पब्लिक कंपन्यांचें वसूल भांडवल ६६१ कोटी रु. होतें; १९५९–६० मध्यें ७,३०६ पब्लिक कंपन्यांचें वसूल भांडवल ८११ कोटी रु. झालें. प्रायव्हेट कंपन्यांची संख्या कायम राहिली आहे, पण त्यांचें वसूल भांडवल त्याच मुदतींत ३०८ कोटी रु. चें ७८१ कोटी रु. झालें आहे.

---

## ओरिसा राज्यांत डॉक्टर्सची टंचाई

ओरिसा राज्यांत डॉक्टर्सची संख्या लोकसंख्येच्या मानानें फार कमी आहे. लोकांची औषधोपचाराची गरज अधिक चांगल्या रीतीनें भागवितां यावी म्हणून ओरिसा सरकारनें पश्चिम बंगाल सरकारकडे ३०० डॉक्टर्स हंगामी कामासाठी पाठवावे अशी मागणी केली आहे. ओरिसांत अधिक डॉक्टर्स यावे म्हणून त्यांच्या पगाराची श्रेणीहि वाढविण्यांत आली आहे. त्याशिवाय जे डॉक्टर्स सेवानिवृत्त झालेले असतील त्यांना ६० वर्षे वयापर्यंत पुन्हा कामावर घेण्याचेंहि ठरविण्यांत आलें आहे. अर्थात् त्यांची प्रकृति चांगली असली पाहिजे. ओरिसांत बेहरामपूर येथें एक नवें मेडिकल कॉलेज स्थापन करण्यांत येणार असून कटक येथील मेडिकल कॉलेजांत अधिक विद्यार्थी घेण्यांत यावयाचे आहेत.

---

## भारतीय हिऱ्याचा लिलांव

गोवळकोंडा येथें सांपडलेल्या खाणींतील हिऱ्याचा पुढील महिन्यांत लंडन येथें लिलाव होणार आहे. या हिऱ्याचें वजन ७८ कॅरट आहे. सध्यां या हिऱ्याचा मालक फ्रेंच आहे. हा हिरा एकेकाळीं आस्ट्रियाचे बादशहा, फ्रॅन्झ जोसेफ यांचेकडे होता. एखादा अमेरिकन नागरिक याचा नवीन मालक होईल अशी शक्यता आहे. या हिऱ्याची किंमत बरीच मोठी भरेल असें म्हणण्यांत येतें.

## हिंदमधील साखरेची अमेरिकेला निर्यात

भारताचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं आपल्या अमेरिकेच्या दौऱ्यांत भारतीय साखरेची अमेरिकेला निर्यात करण्याची सोय केली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील साखर-उत्पादनाचें उद्दिष्ट भारतानें गांठल्यामुळें गरजेपेक्षा अधिक साखर निर्माण होऊं लागली आणि तीसाठी बाजारपेठ शोधणें आवश्यक झालें. चालू वर्षांत अमेरिकेनें भारतापासून २·२५ लाख टन साखर घेण्याचें ठरविलें आहे. पुढील महिन्याच्या प्रारंभीं हीं साखर वाहून नेण्यास सुरुवात होईल असा अंदाज आहे. चालू वर्ष संपण्याच्या आंत सर्व साखर अमेरिकेला पोचविण्यांत यावयाची आहे. ह्या बाबतींत इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनला भारत सरकार मदत करणार आहे. मुंबई, कलकत्ता, मद्रास, कांडला व विशाखापट्टम् ह्या बंदरांतून मुख्यत: साखरेची निर्यात करण्यांत येणार आहे. साखरेची वाहतूक नीट व्हावी म्हणून एक योजनाहि आखण्यांत येत आहे. भारत सरकारचें अन्न व शेतकीखातें आणि रेल्वेखातें ह्यांच्या सहकार्यानें ही योजना पार पाडण्यांत येणार आहे. त्याशिवाय बंदरांमधून साखरेचा सांठा सांठविण्याची सोयहि करण्यांत येणार आहे. भारताला अमेरिकेकडून गहूं मिळतो. गहूं आणणाऱ्या अमेरिकन बोटींचा उपयोग करून साखर पाठवितां येईल काय ह्याचाहि विचार करण्यांत येत आहे. अमेरिकेशिवाय इतर देशांनाहि साखर निर्यात करण्याची खटपट भारत सरकार करीत आहे. इराणला ५०,००० टन साखर निर्यात करण्याचा करार करण्यासाठी सरकारचें प्रतिनिधिमंडळ तिकडे गेलें होतें. तथापि अजून साखरेच्या किंमतीबद्दल उभय देशांत एकमत झालेलें नाहीं.

## आगपेट्यांतील सवलत रद्द

५० काड्यांच्या आगपेट्यांच्या उत्पादनाला 'स्टॅण्डर्डीयझेशन' मिळवून देण्याच्या योजनेनुसार ४० व ६० काड्यांच्या आगपेट्यांस सध्याच्या दरांत मिळत असलेली सवलत १ जून १९६१ पासून रद्द करण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे व ग्रामीण उद्योग म्हणून बांबूपासून तयार करण्यांत आलेल्या आगपेट्यांस मिळणाऱ्या सवलती २८ फेब्रुवारी, १९६२ पर्यंत चालूच ठेवण्यांत येतील.

## भारतांतील स्वस्त मोटारीचें उत्पादन

मोटारीच्या कमी किंमतींच्या उत्पादनाबाबत भारत सरकारनें नेमलेल्या पांडे चौकशी समितीनें, ५,१०० रुपयांत छोटी मोटार तयार होऊं शकेल, असा अभिप्राय व्यक्त केला आहे. यावरील किंमतींत अबकारी कर हिशेबांत धरलेला नाहीं. वरील किंमतींत मोटार हवी असेल तर, वर्षाला ५० हजार मोटारींचें उत्पादन होण्याची आवश्यकता आहे. सरकारी क्षेत्रांत 'डोफेन' मोटारीचें उत्पादन करण्याबद्दल पांडे समितीची शिफारस आहे, असें समजतें. ही मोटार एका गॅलनमध्यें ५० मैल प्रवास करील. प्रस्तुत स्वस्त मोटार तयार करणारी फ्रेंच कंपनी सरकारनें शिफारस केल्यापासून अठरा महिन्यांत कार्यास सुरुवात करील. कमी किंमतीच्या या मोटारीचे, प्रारंभीं ५० टक्के भाग भारतीय बनावटीचे असतील; व हें प्रमाण ९० टक्केपर्यंत नेण्यांत येईल.थोडक्यांत,ही पूर्ण भारतीय मोटार म्हणून नांवारूपास येईल.

## सिंगर शिवणयंत्राचा ब्रह्मदेशांतील कारखाना

सिंगर शिवण–यंत्राच्या कंपनीनें ब्रह्मदेशाच्या सरकारकडे शिवणाचीं यंत्रें जुळविण्याचा एक कारखाना काढण्याची परवानगी मागितली आहे. कारखान्यांत दरसाल २५,००० यंत्रें जुळविण्यांत येतील व त्यामुळें ब्रह्मदेशाची ८० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होईल. कारखाना चालू झाल्यास तो ब्रह्मदेशाची शिवणाच्या यंत्रांची निम्मी गरज भागवूं शकेल. ब्रह्मदेश दरसाल ५०,००० यंत्रें आयात करतो व त्यांपैकी निम्मी जपानहून आणलीं जातात. जपान हीं यंत्रें युद्धांतील नुकसान-भरपाई म्हणून ब्रह्मदेशाला देतो. ब्रह्मदेशांत तयार होणाऱ्या यंत्रांची किंमत प्रत्येकी अवघी २६५ रुपये असेल.

## निवृत्त शास्त्रज्ञांची खास सोय

शेती, पशुसंवर्धन व इतर संबंधित क्षेत्रांतील सेवानिवृत्त प्रमुख शास्त्रज्ञांना कांहीं तरी उपयुक्ततेसाठी पुन्हां राबविण्याकरितां म्हणून एक योजना आंखण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. या योजनेची तयारी शेतकी संशोधन मंडळानें हातीं घेतली आहे. अशा प्रकारचे जे कोणी शास्त्रज्ञ सध्यां संशोधनांत गुंतले असतील त्यांना या योजनेनुसार, मंडळाकडून योग्य द्रव्यसाहाय्य देऊन संशोधन–कार्य पुढें चालू ठेवण्यास त्यांस सांगण्यांत येईल.

## अमेरिका भारताची साखर घेणार

अमेरिकेनें भारत, ऑस्ट्रेलिया व पॅराग्वे या देशांमधून साखर खरेदी करण्याचें ठरविलें आहे; व तशी परवानगीहि देण्याचें ठरलें आहे. भारताला २,२५,००० टन साखर निर्यात करण्यास लायसेन्स मिळेल असें वाटतें.

## दंडकारण्यांत चार नवीन धरणें

दंडकारण्य योजनेनुसार, या भागांत चार नवीन धरणें बांधण्याचा विचार चालू आहे.यासंबंधीं प्राथमिक कामकाजास सुरुवातहि झाली आहे. या दंडकारण्य योजनेंत, नवीन बांधण्यांत येणाऱ्या या नव्या दर धरण–योजनेला एकूण सहा कोटी रुपये खर्च येणार आहे.

## रशियाचीं लुमुम्बाचीं तिकिटें

कांगोचे खून झालेले पंतप्रधान श्री. पेट्रिस लुमुम्बा यांचें छायाचित्र असलेलें पोस्टाचें एक तिकिट सोव्हिएट रशियानें काढून प्रसिद्ध केलें आहे. तिकिटावरील या छायाचित्राची पार्श्वभूमि लिंबु रंगाची आहे.

## टोळांची खाण्याची ताकद

अन्नधान्य खात्याच्या टोळ नियंत्रण तज्ज्ञांनीं असें स्पष्ट केलें आहे कीं, टोळ हा आपल्या वजनाइतकें धान्य खातो. १ चौरस मैलाच्या टापूंत ३०० टन वजनाचे टोळ असतात व ते २४ तासांच्या काळांत तितक्याच टन वजनाचें अन्नधान्य फस्त करतात. मोठाल्या थव्यांमध्यें २०० कोटी टोळ असतात.

## नेपाळमधील पाट्या नेपाळींत !

नेपाळमधील सर्व पाट्या नेपाळी भाषेंत आणि देवनागरी लिपींतच लिहिलेल्या असल्या पाहिजेत, असा नेपाळच्या गृहखात्यानें हुकूम काढला आहे. परदेशीयांनींसुद्धा हा हुकूम पाळला पाहिजे; त्यांनीं त्याबरोबर इंग्रजीचा वापर करायला परवानगी आहे.

## इराणपुढील परदेशीय चलनाचा प्रश्न

भारत प्रमाणेंच इतर अनेक मागासलेल्या देशांना परदेशीय चलनाच्या टंचाईचा प्रश्न भेडसावीत आहे. आर्थिक दृष्ट्या अप्रगत असलेले देश औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांकडून मदत घेऊन आपली भरभराट साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. इराणलाहि आपली आर्थिक प्रगति करून घेतांना परदेशीय चलनाची टंचाई भासत आहे. इराणच्या परदेशीय देण्या-घेण्याच्या व्यवहारांत समतोलपणा राखणें जरूरीचें झाल्यामुळें पंतप्रधान डॉ. अली अमिनी ह्यांनीं कांहीं कडक आर्थिक निर्बंध अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय परदेशीय चलनाची टंचाई आटोक्यांत येणार नाहीं असें त्यांना वाटत आहे. इराणच्या सरकारनें मोटारी, उंची दारू, अत्तरें, सेंटस, इत्यादि अनेक प्रकारच्या परदेशीय चैनीच्या वस्तु आयात करण्यास बंदी केली आहे. त्याचप्रमाणें इराणी नागरिकांच्या परदेशगमनावराहि बंदी घालण्यांत आली आहे. रोज खपाच्या पण चैनीच्या परदेशीय वस्तूंवर आयातबंदी घालण्यांत आल्यामुळें इराणची दरसाल १·८ कोटी पौंडांची बचत होईल आणि परदेश-प्रवासावरील बंदीमुळें ५० लाख पौंड वाचतील असा अंदाज करण्यांत आला आहे. इराणमधून पुष्कळसे विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशांत गेले आहेत. हे विद्यार्थी परदेशांत काय करतात ह्यावर सक्त नजर ठेवण्याच्या सूचनाहि सरकारनें शिक्षणखात्याला दिल्या आहेत. परदेशीं गेलेला प्रत्येक इराणी विद्यार्थी दरमहा १०० ते २०० पौंड खर्च करतो असें आढळून आलें आहे. पश्चिम युरोपांत सुमारें १५,००० इराणी विद्यार्थी शिकण्यासाठी गेलेले आहेत. त्यांपैकी निम्मे तरी विद्यार्थी तेथें असण्याचें कांहीं कारण नाहीं. कांहीं विद्यार्थी तर परदेशांतून धंदा करतात असें शिक्षणखात्याला समजलें आहे.

---

## मेटुर येथें अल्युमिनियमचा कारखाना

मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्री श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांनी मद्रास राज्यांत मेटुर येथें अल्युमिनियमच्या कारखान्याच्या पायाचा दगड बसविला. एका इटालिअन कंपनीच्या तांत्रिक साह्यानें मद्रास अल्युमिनियम कंपनी हा कारखाना उभारीत आहे. पुष्कळसे उद्योग-धंदे असे आहेत कीं, ज्यांत अल्युमिनियमचा वापर करावा लागतो. त्यांची सोय ह्या कारखान्यानें होईल. कारखान्याच्या कोनशिला-स्थापनप्रसंगीं बोलतांना श्री. शास्त्री म्हणाले कीं, कारखान्याच्या चालकांनीं आपली स्वतंत्र अशी प्रयोगशाळा काढावी व तांत्रिक शिक्षण देऊन कुशल कामगार तयार करण्याचीहि व्यवस्था करावी. भारत सरकारनें १९४७ सालापासून देशांतील खनिज संपत्तीचा शोध लावण्याचे कामास प्रारंभ केला. तरीपण अजून खनिजासंबंधीं संपूर्ण माहिती हातीं आलेली नाहीं. अशा परि-स्थितींत कांहीं खनिजें परदेशांतून आयात करण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. भारत दरसाल १७ कोटी रुपयांचें तांबें, ८ कोटी रुपयांचें शिसें आणि ५ कोटी रुपयांचें अल्युमिनियम आयात करतो. अर्थात्च ह्या आयातीमुळें भारताच्या परदेशीय चलनाच्या सांठ्यावर फार ताण पडतो. अल्युमिनियम हा एक असा धातु आहे कीं त्याच्या उत्पादनासाठी लागणारें खनिज भारतांत विपुल प्रमाणांत आहे. म्हणून देशांतच अल्युमिनियम तयार करूं लागणें महत्त्वाचें आहे. सध्यां देशांत १८,००० टन अल्युमिनियम तयार होतें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अल्युमिनियमचें उत्पादन ८८,००० टनांपर्यंत वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. हें उद्दिष्ट गाठण्यासाठी अल्युमिनियमच्या सध्यांच्या कारखान्यांचा विस्तार करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें कांहीं नवे कारखानेहि काढण्यांत यावयाचे आहेत. मेटुर येथें उभारण्यांत येत असलेला कारखाना त्यांपैकींच आहे. आणखी एक कारखाना उत्तर-प्रदेशांत रिहंड येथें काढण्यांत येणार आहे.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गिरगांव, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

**Deccan Institute of Commerce**
717, Budhwar Peth, Opp.—Jijamata Garden, Poona 2.

Estd.—1918.] [Telephone No. 2360.

Opens for the New 1961–62 year on Friday, 23rd June, 1961. Students coached up for G. C. D., D. Com., G. D. C. and A., Costing, Company Secretary, Insurance, Banking, Accountancy, Shorthand, Typewriting and External Pre-Degree Commerce and B. Com. Degree Courses and 3 Months' Bankers Practical Training Course.

**Morning and Evening Classes.] [Prospectus Free.**

**कौटुंबिक हितगुज**

श्री. वा. काळे ह्यांनीं अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत लिहिलेल्या लेखमालेनें 'किर्लोस्कर'च्या हजारों वाचकांची पकड घेतली आहे. ह्या लेखमालेंतील निवडक लेख एकत्रित केलेला संग्रह 'किर्लोस्कर प्रेस'तर्फे प्रसिद्ध होत आहे.

पृ. सं. अंदाजें ११२] [किंमत ३ रु.

## बँक ऑफ कोंकणचें विलिनीकरण अमलांत आलें

ता. १९ जून, १९६१ पासून बँक ऑफ कोंकण लि. चे सर्व व्यवहार भारत सरकार व रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या आदेशाप्रमाणें बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें स्वतःकडे घेतले असून बँक ऑफ कोंकण लिमिटेडच्या मालवण, रत्नागिरी, सावंतवाडी, बांदा, कुडाळ व फोंडा या शहरांतील शाखा ता. १९ जून, १९६१ पासून बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या शाखा म्हणून सुरू झाल्या आहेत. बँक ऑफ कोंकणच्या सर्व खातेदारांच्या खात्यांवर जमा असलेल्या रकमा त्या दिवशीं बँक ऑफ महाराष्ट्राकडे पूर्णपणें जमा धरण्यांत आल्या आहेत.

कोंकणच्या स्थानिक व परपेठांतील व्यापारास व तेथील लहानमोठ्या कारखानदारीस उत्तेजन मिळेल अशा रीतीनेंच बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोंकण विभागांतील सर्व शाखांचे व्यवहार चालविले जातील. कोंकणांतील व्यापारी, कारखानदार व सर्वसामान्य जनता, बँक ऑफ महाराष्ट्र लि. या संस्थेशीं संपर्क साधून आपला आर्थिक फायदा करून घेण्याची संधि साधेल असा बँक ऑफ महाराष्ट्राच्या संचालकांना विश्वास वाटत आहे, असें बँकेनें जाहीर केलें आहे.

## न्यूयॉर्क शहरांत पांच तास अंधार

अमेरिकेंतील न्यूयॉर्क शहराला १३ जूनच्या रात्रीं ५ तासपर्यंत अंधारांत चांचपडावें लागलें. विजेच्या पुरवठ्यांत आलेल्या ह्या व्यत्ययाची कसून चवकशी करण्यांत येत आहे. विजेच्या पुरवठ्यांत खंड पडला तेव्हां बरीच रात्र झाली होती व उकाडाहि विलक्षण होता. हजारों लोक इमारतींमधील विजेच्या पाळण्यांत तीन तीन तासपर्यंत अडकून पडले. भुयारी रेल्वेंतून प्रवास करणाऱ्या गाड्या जागच्या जागीं थांबल्या व त्यामुळें गाड्यांतील प्रवाशांची अतिशय कुचंबणा झाली. इस्पितळांनीं तात्पुरत्या जनरेटर्ससाठी धांवाधांव केली. टाइम्स स्केअर व ब्रॉडवे ह्या प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक नियंत्रण करणारे दिवे गेल्यामुळें हजारों वाहनें थबकून राहिलीं. वाहतूक चालू ठेवण्यासाठीं २,५०० पोलिसांची मदत घेण्यांत आली.

## भारतामधील बेकारीचा अंदाज

जिनिव्हा येथें भरलेल्या ४५ व्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेला कारखानदारांचे प्रतिनिधि म्हणून श्री. बाबूभाई चिनॉय गेले होते. परिषदेंत भाषण करतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, १९६५ च्या सुमारास भारतामधील बेकारांची संख्या सुमारें १ कोटी असेल. भारतामधील मजूरविषयक प्रश्नांचा विचार करतांना भरमसाठ वाढणाऱ्या लोकसंख्येची पार्श्वभूमि लक्षांत घेतली पाहिजे. १९६१ च्या शिरगणतींत मिळालेल्या माहितीवरून पुढील पांच वर्षांच्या कालांत काम करण्यास लायक अशा लोकांच्या संख्येंत १.८ कोटी लोकांची भर पडेल. वाढत्या लोकसंख्येमुळें उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांना मर्यादा पडते.

## अमेरिकन स्त्रिया आपले कान टोचूं लागल्या

कित्येक अमेरिकन स्त्रिया आतां आपले कान टोचून घेऊं लागल्या आहेत. न्यूयॉर्कमधील एका सुप्रसिद्ध सराफानें प्रसिद्ध केलेल्या जाहिरातींत म्हटलें आहे, कीं त्यानें कान टोंचण्यासाठी तज्ज्ञांची नेमणूक केली असून १,००,००० स्त्रियांनीं त्याचेकडून कान टोंचून घेतले आहेत. कर्णभूषणें चापानें बसविण्यापेक्षा टोंचलेल्या कानांत तीं अडकविण्यानें हरविण्याची भीति उरत नाहीं, हें अमेरिकन स्त्रियांना पटूं लागलें आहे.

## चलनाची घसरती किंमत

फर्स्ट नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्कनें प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांप्रमाणें जगांतील सर्व देशांच्या चलनाची किंमत घसरलेली आढळते. १९५५ च्या आंकड्यांत १९५० चे मानानें भारताच्या रुपयाची किंमत वाढलेली दिसून येत आहे.

| | चलनाच्या किंमतीचा निर्देशांक | | | घटीची वार्षिक गति | |
|---|---|---|---|---|---|
| | १९६० | १९५५ | १९५० | १९५५-६० | १९५०-५५ |
| सिलोन | ९३ | ९६ | १०७ | ०.३ | ०.८ |
| स्वित्झरलंड | ८७ | ९२ | १०० | १.१ | १.६ |
| जर्मनी | ८२ | ९१ | १०० | २.२ | १.८ |
| भारत | ८१ | १०६ | १०० | ५.१ | −१.१ |
| युनायटेड स्टेटस | ८१ | ९० | १०० | २.१ | २.१ |
| कॅनडा | ८० | ८८ | १०० | १.९ | २.५ |
| पाकिस्तान | ७५ | ९० | १०० | ३.६ | २.५ |
| जपान | ६७ | ७४ | १०० | २.० | ५.९ |
| ग्रेट ब्रिटन | ६७ | ७६ | १०० | २.६ | ५.२ |
| फ्रान्स | ५७ | ७६ | १०० | ५.५ | ५.३ |

## छोट्या बचत-योजनेची प्रगति

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत छोट्या बचत रोख्यांपासून ४०६ कोटी रु. निव्वळ जमा झाले. १९६०-६१ या वर्षांत १०६ कोटी रु. जमा झाले असून हा उच्चांकी आंकडा त्यामागील वर्षापेक्षां २२ कोटी रुपयांनीं जास्त आहे. या योजनेंत सध्या सुमारें ८० हजार अधिकृत एजंट असून त्यांपैकी सुमारें ३० हजार प्रत्यक्ष कामांत आहेत. तिसऱ्या योजनेंत या कार्यक्रमाद्वारा ५८५ कोटी रुपये जमविण्याचा विचार आहे.

## कॉस्टिक सोड्याचा नवा कारखाना

जयपूरजवळ कोटा येथें कॉस्टिक सोडयाचा ५ कोटी रुपये खर्च करून नवीन कारखाना सुरू करण्यांत यावयाचा आहे. ही कॉस्टिक सोड्याची फॅक्टरी खाजगी मालकीची असून, ती १९६२ मध्यें सुरू होईल असें वृत्त आहे. या कारखान्यासाठी १५ हजार किलोवॅटस् वीज राखून ठेवण्यांत येणार असून, पांच वर्षांत या कारखान्याकरितां म्हणून ती दर युनिटमागें नये तीन पैसे या दरानें पुरविण्यांत यावयाची आहे.

## टेस्ट सामन्यांतील कामगिऱ्यांना रोख बक्षिसें

ग्रेट ब्रिटनमधील सिगारेटच्या एका बड्या फर्मनें इंग्लंड-ऑस्ट्रेलिया टेस्ट सामन्यांतील उत्कृष्ट कामगिऱ्यांसाठी सुमारें सव्वा लक्ष रुपयांचीं बक्षिसें जाहीर केलीं आहेत. एक टेस्ट सामना जिंकणाऱ्या संघाला ८,००० रु. मिळतील; प्रत्येक टेस्ट सामन्यांत दर १०० चेंडूवर जास्तींत जास्त धांवा काढणाऱ्या संघालाहि तेवढेंच बक्षीस मिळेल. सर्वांत जलद १०० धांवा काढणाराला, सर्वांत यशस्वी गोलंदाजाला, सर्व सामन्यांत मिळून सर्वांत जास्त वेगानें धांवा मिळविणाऱ्याला, यष्टिरक्षक वगळून सर्वांत जास्त झेल घेणाराला, सर्वांत जास्त झेल घेणाराला, सर्वांत जास्त (किमान १५) बळी घेणाऱ्या यष्टिरक्षकाला, एका फेरींत जास्तींत जास्त फलंदाज चीत करणाऱ्या गोलंदाजाला, अशीं वैयक्तिक बक्षिसेंहि ठेवलेलीं आहेत प्रत्येक बक्षीस ६ हजार रु. चें आहे.

## महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांच्या उत्पादनक्षमतेचें रहस्य

हिंदी साखरेच्या उत्पादनाची किंमत उतरल्याखेरीज परदेशी बाजारपेठेंत ती खपणार नाहीं आणि भारतांतहि पुरेसे गिऱ्हाईक मिळणार नाहीं. महाराष्ट्रांतील कारखान्यांच्या स्वतःच्या फार्ममधील उसाचें उत्पादन आणि दर एकरी साखरेचा उतारा, ह्याविषयींचे खालील आंकडे उद्बोधक आहेत.

टँड सीलिंग बिलामुळें हें उत्पादन कमी होईल, असें महाराष्ट्रांतील कारखानदारांचें म्हणणें आहे.

| | दर एकरी उसाचें उत्पादन ( टन ) | उसापासून निघणारी साखर % | दर एकरी साखरेचें उत्पादन(टन) |
|---|---|---|---|
| | (१९५८-५९) | (१९५८-५९) | (१९५८-५९) |
| (१) महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांची सरासरी | ५४·७३ | ११·४६ | ६·२७ |
| (२) सबंध महाराष्ट्राची सरासरी | २५·४८ | ११·४६ | २·९२ |
| (३) मद्रासची सरासरी | २४·३५ | ९·०१ | २·१९ |
| (४) उत्तर प्रदेशाची सरासरी | ११·२० | ९·६० | १·०८ |
| (५) सबंध भारताची सरासरी | १४·६६ | ९·८४ | १·४४ |

## स्वस्त किंमतीच्या मोटारविषयक समितीचा अहवाल

सरकारी क्षेत्रांत स्वस्त किंमतीच्या मोटारींचें उत्पादन करण्याची शक्याशक्यता कितपत आहे याचा अभ्यास करण्याकरितां भारत सरकारनें नेमलेल्या समितीनें आपला अहवाल मध्यवर्ती व्यापार व उद्योगखात्याला सादर केला. सामग्रीच्या प्रचलित किंमती, मजुरीचे दर आणि कर विचारांत घेतां, प्रतिवर्षी ५०,००० मोटारींचें उत्पादन केल्यास, ५,१०० रु. स (अबकारी कर वगळून) मोटार मिळूं शकेल असें मत समितीनें व्यक्त केल्याचें समजतें. परंतु दरवर्षी २०,००० मोटारी तयार केल्यास, कारखान्यांत मोटारीची किंमत ( अबकारी कर वगळून ) ६,१५० रु. पडेल असेंहि या समितीनें नमूद केलें आहे.

## स्टेशनमास्तरची आत्महत्या

ओसाका ( पश्चिम जपान ) येथील एका स्टेशनमास्तरानें गळयाला फांस लावून आत्महत्या केली. लोकांच्या गर्दीला आगगाडयांत जागा मिळवून देणें त्याला अशक्य झालें, हें त्याच्या आत्महत्येचें कारण होतें.

## एस. एस. सी. च्या परीक्षकांच्या वेतनांत वाढ

एस. एस. सी. च्या परीक्षकांना व मॉडरेटर्सना सध्यां तीन तासांची प्रत्येक उत्तरपत्रिका तपासण्यासाठी ६२ नये पैसे मिळतात; हें वेतन आतां ७५ नये पैसे करण्यांत आलें आहे. एस. एस. सी. बोर्डाच्या ह्या निर्णयास ह्या महिनाअखेर राज्य सरकारची मान्यता मिळेल, अशी अपेक्षा आहे. गेल्या मार्चमधील परीक्षेसाहि ही सुमारें २०% वेतनवाढ लागू करण्यांत येईल.

## बेलापूर कामगारांना पांच महिन्यांच्या पगाराइतका बोनस

बेलापूर शुगर कंपनीच्या कामगारांना १९५९-६० साठी पांच महिन्यांच्या पगाराइतका बोनस मिळणार आहे. १५ जून, १९६० च्या आंत तो वाटून पुरा झाला; त्याची रकम ५·५ लक्ष रु. भरली.

## पुणें सें. को. बँकेचें ओतूर पे-ऑफिस

पुणें सें. को. बँकेनें जुन्नर तालुक्यांत ओतूर येथें बँकेचें पे-ऑफिस सुरू करण्याचें निश्चित केलें आहे. त्याचें उद्घाटन मा. भाऊसाहेब हिरे, बी. ए., एलूएल्. बी. उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई, यांचे शुभहस्तें, मंगळवार, दि. २० जून, १९६१ रोजीं ओतूर येथें सायंकाळीं ५ वाजतां झालें. मा. ना. स. ऊर्फ मामासाहेब मोहोळ, उपाध्यक्ष, विकास मंडळ, हे अध्यक्षस्थानीं होते.

## बोट बांधण्याच्या कारखान्याचा विस्तार

विशाखापट्टम् येथील हिंदुस्थान शिपयार्ड ह्या बोटी बांधण्याच्या कारखान्याचा विस्तार करण्याचें घाटत आहे. त्यासाठी नाविक एंजिनिअरिंग ह्या विषयाचे पदवीधर वाढत्या प्रमाणावर घेण्यांत यावयाचे आहेत. खरगपूर येथील तांत्रिक शिक्षणसंस्थासारख्या संस्थांतुन अशा कुशल तंत्रज्ञांना खास शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. कांहीं वर्षांच्या अनुभवानें ते आपलें काम उत्कृष्टपणें पार पाडूं शकतील. हिंदुस्थान शिपयार्ड कंपनीकडे सध्यां १० बोटींच्या मागण्या नोंदलेल्या आहेत. हें काम तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या तिसऱ्या वर्षापर्यंत कारखान्याला पुरेल. कारखान्यांत बांधण्यांत येणाऱ्या कांहीं बोटींचे नमुने जपानी कारखान्यांनीं पुरविलेले आहेत.

## १२२·७६ कोटी रु. किंमतीच्या देशी साहित्याची खरेदी

सरकारनें एप्रिल, १९६० ते जानेवारी, १९६१ या कालावधींत दि डायरेक्टोरेट जनरल ऑफ सप्लाईज ॲण्ड डिस्पोझल्सकडून १५१·५ कोटी रुपये किंमतीच्या मालाची खरेदी केली असून त्यापैकी १२२·७६ कोटी रुपये किंमतीचा माल देशी आहे. यांपैकी ५·९३ कोटी रुपये किंमतीच्या मालाचें उत्पादन छोट्या उद्योगधंद्यांनीं केलें आहे.

## अध्यक्ष केनेडींना कुबडया वापराव्या लागल्या

अध्यक्ष केनेडी ह्यांच्या हस्तें दि. १६ मे रोजीं ओटावा येथील गव्हर्नमेंट हाऊसमध्यें वृक्षारोपण समारंभ झाला. त्यावेळीं मातीनें भरलेलें खोरें उचलतांना त्यांची पाठ लचकली. तें दुखणें चालू असतांनाच ते पॅरीश, व्हिएन्ना आणि लंडन येथें जाऊन आले. अजूनहि तें दुखणें थांबलें नाहीं, म्हणून कांहीं दिवस ते चालतांना कुबडया वापरीत आहेत.

**कावेरीच्या खोऱ्यांत तेलाचा शोध**—मद्रास राज्यांतील कावेरीच्या खोऱ्यांत खनिज तेलाचा शोध करण्याच्या कामाला चालू वर्षाच्या अखेरीस सुरुवात होईल. ज्या भूभागांत तेलाचा शोध करावयाचा त्याची आंखणी जवळ जवळ पुरी झाली आहे. तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामग्री हातीं येतांच पुढील कामाला प्रारंभ होईल. दक्षिण भारतांत तेलाचा शोध करण्याची ही पहिलीच योजना आहे.

**विजेच्या दुरुपयोगाबद्दल टीका** दिल्लीसारख्या मोठ्या शहरांत रंगी-बेरंगी विजेच्या दिव्यांच्या माळा एखाद्या इमारतीवर लागल्या म्हणजे तेथें विवाह साजरा होत असल्याचें सूचित होतें. परंतु पं. नेहरूंना विजेचा हा दुरुपयोग पसंत नाहीं. देशांत विजेचा पुरवठा अपुरा असतांना लग्नसमारंभप्रसंगीं करण्यांत येत असलेली रोषणाई अनाठायी आहे,असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

### सिलोनमधील आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण

सीलोनच्या कायदेमंडळाच्या प्रतिनिधिगृहानें 'जनता बँके'ची स्थापना करण्याची तरतूद करणाऱ्या कायद्यास एकमतानें मंजुरी दिली आहे. जो शेतकरी आर्थिक आपत्तींत सांपडेल त्याला मदत करण्यासाठी ह्या बँकेची स्थापना करण्यांत येणार आहे. सीलोनच्या सरकारनें समाजवादाचा पुरस्कार केला आहे. समाजवादी आर्थिक कार्यक्रमाचा भाग म्हणून ह्यापूर्वी सरकारनें पेट्रोलच्या पदार्थांच्या आयातीसाठी व वांटपासाठी एका स्वतंत्र कॉर्पोरेशनची स्थापना केली आहे. त्याशिवाय आयुर्विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें आहे. ह्या कार्यक्रमामुळें राष्ट्रीय उत्पन्न वाढेल आणि लोकांची स्थिति सुधारेल, अशी सरकारची अपेक्षा आहे.

---

### बरौनी येथील कारखान्याची यंत्रसामग्री

उत्तर बिहारमध्यें बरौनी येथें काढण्यांत यावयाच्या तेल-शुद्धीच्या कारखान्याची यंत्रसामग्री रशिया पुरविणार आहे. ह्या कामीं मॉस्को येथें वाटाघाटी चालू आहेत. सोव्हिएट तंत्रज्ञांनीं कारखान्याची संपूर्ण योजना तयार केली आहे. ह्या कारखान्यांत दरसाल २० लाख टन तेल शुद्ध करण्यांत येईल. कारखान्याची उभारणी रशियन तंत्रज्ञ करतील. गुजरातमध्यें अंकलेश्वर येथें सांपडलेल्या अशुद्ध तेलाचें प्रायोगिक शुद्धीकरण येत्या सप्टेंबर महिन्यापासून चालू होण्याचा संभव आहे.

---

### डिझेलवर चालणारीं रेल्वे एंजिनें

डिझेल तेलावर चालणाऱ्या रेल्वे एंजिनाचा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. कारखान्याची जागा अद्याप निश्चित करण्यांत आलेली नाहीं. पण तो रांची, नांगल अगर हैदराबाद, ह्यांपैकीं एका ठिकाणीं काढण्यांत येण्याचा संभव आहे. कारखान्याची जागा ठरल्यावर परदेशीय मदत घेण्यासंबंधीं विचार करण्यांत येईल. पश्चिम जर्मनीकडून आलेल्या सहा रेल्वे एंजिनांत एका भारतीय एंजिनिअरानें लावलेल्या शोधाचा उपयोग करण्यांत आलेला आहे. हीं एंजिनें चांगलीं ठरलीं तर डिझेल एंजिनांच्या बनावटींतहि त्या शोधाचा उपयोग करून घेण्यांत येईल.

---

### रशियाकडून ३० लाख गॅलन केरोसिन व हायस्पीड डिझेल ऑईलची आयात

"रावा रुसाकूजा" या नांवाची रशियन तेलवाहू बोट ८ जून रोजीं मुंबई बंदरांत ३० लाख गॅलन उत्कृष्ट दर्जाचें केरोसिन व हायस्पीड डिझेल तेल घेऊन येत आहे. दहा महिन्यांपूर्वी या कंपनीनें आयातीचा कार्यक्रम सुरू केल्यापासून ही आयात जमेस धरतां रशियाकडून २ कोटी गॅलनहून अधिक केरोसिन व हायस्पीड डिझेल तेलाची आयात पूर्ण होईल. हा माल घेऊन येणारी ही सातवी रशियन तेलवाहू बोट आहे.

---

### नापसंत बुटांचे प्रचंड साठे

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें रशिया व पोलंडकडे निर्गत केलेल्या बुटांच्या जोड्यांपैकीं १०·२० लक्ष रुपये किंमतीच्या जोड्या नापसंत होऊन गुदामांत पडून आहेत.

---


# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके



स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. हलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

३१ डिसेंबर, १९६०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०१,००० |
| ठेवी | रु. | २,२५००,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ०,९९,००,००० |

ठेवीवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०-५० २. सेव्हिंग्ज बँक २-५०

३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३-००

मुदत ठेवी—१ वर्ष ३-०० २ वर्षें ३-२५

३ वर्षें ३-७५ ५ वर्षें ४-००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी., चेअरमन.

**नेपाळी गिर्यारोहकाला मदत**—हिमालयांतील एक शिखर पादाक्रांत करण्यासाठी जपाननें पाठविलेल्या एका तुकडींत शेर्पा जी. नोर्बू हा होता. ह्या मोहिमेंत नोर्बू व आणखी दोन जपानी गिर्यारोहक ठार झाले. हे तिघेजण रात्रीं छावणींत झोपले असतां त्यांच्या तंबूवर बर्फाचा कडा कोसळला. शेर्पा जी. नोर्बू ह्याच्या निराश्रित कुटुंबाला जपानमधील ओसाका विद्यापीठानें आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे.

**निर्यात व्यापारावर परिणाम**—कलकत्ता शहरांतील विजेच्या पुरवठ्यांत कपात झाल्यामुळें निर्यात व्यापारावर वाईट परिणाम झाला आहे. नव्यानें स्थापन करण्यांत आलेल्या कांहीं कारखान्यांना विजेचा पुरवठा न झाल्यामुळें उत्पादन चालू होऊं शकलें नाहीं. दररोज सुमारें ४,६४,००० रुपयांच्या उत्पादनाचें नुकसान होत आहे. त्याशिवाय मालाच्या अपुऱ्या उत्पादनामुळें किंमती वाढत आहेत.

**तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—सेंट्रल बँक ऑफ इंडिआच्या वार्षिक सभेचे अध्यक्ष ह्या नात्यानें भाषण करतांना श्री. होमी मोदी म्हणाले कीं, भारताचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांच्या इतका मोठा आहे. परंतु विकासकामांच्या पूर्वीच्या दृष्टीनें तो कमी ठरणार आहे. एक-सारख्या वाढत जाणाऱ्या किंमतीमुळें प्रत्यक्ष कामें कमी होतील असा संभव आहे.

**केरळ विद्यापीठाचा उपक्रम**—केरळ विद्यापीठानें पाण्यांत राहणाऱ्या जीवसृष्टीचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यापीठ अनुदान मंडळानें विद्यापीठाला ९ लाख रुपयांची मदत केली असून त्याशिवाय दरसाल आणखी कांहीं मदत देण्याचा विचार चालू आहे. हिंदी महासागराचें संशोधन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांचें एक मंडळ लवकरच केरळमध्यें जाणार आहे.

**निरुपयोगी घोडे परत**—अहमदाबादच्या नागरिकांना घोडदौडीची मजा करतां यावी म्हणून एका माजी संस्थानिकानें अहमदाबादच्या कॉर्पोरेशनला ४ घोडे दिले होते. कॉर्पोरेशननें हे घोडे तीन वर्षें बाळगले व त्यांच्यासाठी १५,००० रुपये खर्च केले. घोड्यांचा उपयोग कॉर्पोरेशनला करतां न आल्यामुळें आतां ते मूळच्या मालकाला परत करण्यांत आले आहेत. घोड्यांसाठी आणखी खर्च करण्याची कॉर्पोरेशनची तयारी नाहीं.

**सीलोनमधील तेलाचा शोध**—सीलोनमध्यें खनिज तेल सांपडण्याचा संभव आहे असें मत रशिअन शास्त्रज्ञांनीं व्यक्त केलें आहे. सध्यां सीलोनला लागणारें तेल आयात केलें जातें. सीलोनच्या उत्तर भागांत हें तेल सांपडण्याचा संभव आहे. तेलाचा शोध करण्याचें काम एक अमेरिकन कंपनी करण्याची शक्यता आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग – व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत " ३। "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें " ५ "
मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलि. : ७००१४
महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक
भाग भांडवल : ... ... रु. ८,७५,०००
रिझर्व्ह फंडस् : ... ... रु. १०,०८,०००
ठेवी : ... ... रु. १,४५,५७,०००
खेळतें भांडवल : ... ... रु. १,७३,००,०००
शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.
मिर्यांची शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.